Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

2nd March 2019 Special Issue- 147 (I)

# Agriculture & Water Management in Historical Period in India

(2) Dr. Kailas Sawant
(History)

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Kshirsagar O.M.
Principal
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) - 413517

**Co- Editor of This Issue**
Dr. Shinde A.N.
HOD. Dept. of History,
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) – 413517

Assist.Prof. Patil J.J.
Dept. of History,
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) – 413517

RESEARCH JOURNEY

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**2nd March 2019 Special Issue- 147 (I)**

# Agriculture & Water Management in Historical Period in India

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Dr. Kshirsagar O.M.**
**Principal**
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) - 413517

**Co- Editor of This Issue**
**Dr. Shinde A.N.**
HOD, Dept. of History,
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) – 413517

**Prof. Patil J.J.**
Dept. of History,
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) – 413517

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) – 0.676 Special Issue – 147 (I) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management In Historical Period In India

# Index


1. Water Literacy Through School Education — 6
   **Dr. O. M. Kshirsagar , Jagannath B. Darandale**
2. Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj's Agricultural Policies — 8
   **Dr. Shinde Anant Namdevrao**
3. Ancient Techniques of Water Management — 10
   **Dr. Rajaram R.Pimpalpalle**
4. Khazana Bawali: The Best Example Of Water Management In Medieval India — 17
   **Prof. Ravi S. Satbhai**
5. Water Management In The Fort - With Special Reference To Daulatabad — 21
   **Dr. Gorakhnath P. Phasale**
6. Water Literacy: A perfect solution for Environmental Pollution — 25
   **Sadhana K. Patil**
7. Water Management During The Tughalak Period — 27
   **Mr. Pawar Dattatray Vilas**
8. The Irrigation Policy in Marathwada Under the Last Nizam — 29
   **Ashwini Subhash Khandekar**
9. Agriculture and Water Management in British Period — 32
   **Dr. DevidasTumkunte**
10. Geographical Analysis Monthly Rainfall InChakur — 35
   **B.A. Motherao**
11. Agriculture and Irrigation in Hyderabad-Karnataka Region:A Historical Survey — 37
   **Dr. DevidasTumkunte, Sangeeta**
12. Water Crisis in Contemporary India — 40
   **Asst. Prof. More J.G.**
13. Irrigation Projects in Marathwada Region — 43
   **Dr. Vinkar V.N.**
14. Problems And Solutions Of Agriculture After Independence" — 45
   **Dr.Prof. Sangita Ghar, Prof. Nitin V Dadge**
15. Water management system in Chalcolithic age — 48
   **Mr. Bindge S.M. , Prof. Dr. Sawant U.S.**
16. Water Management in India — 50
   **Asst. Prof. Mrs. Rekha B. Lonikar**
17. Water Management on Fort : Shivaji Maharaj Era — 53
   **Prof. Vaijinath Chickbase**
18. शिवकालीन जलव्यस्थापन– एक अभ्यास — 56
   **प्रा. डॉ. मारोती किशनराव जाधव**
19. ब्रिटिश कालीन भारतातील कृषी व जलसिंचन व्यवस्था — 58
   **प्रा.डॉ.गव्हाणे रमाकांत बबनराव**

39. "स्वातंत्र्योत्तरकालीन : पाण्याचा ज्वलंत प्रश्न आणि उपाय" 106
**प्रा.डॉ.भालेराव युलिसिस एकनाथ**

40. जल व्यवस्थापनातील लोक सहभाग आणि परंपरा : एक अभ्यास 108
**प्रा. डॉ. जि. व्ही. गट्टी**

41. जल साक्षरता काळाची गरज 110
**प्रा. डॉ.दत्ता दिगंबर कोल्हेकर**

42. श्रीरामपुर तालुक्यातील ब्रिटीश कालीन जलव्यवस्थापन विषयक दृष्टीकोन :लाख बंधाऱ्याचा अभ्यास 112
**प्रा.डॉ.एस.व्ही. निळे**

43. पाण्याचा योग्य वापर ही काळाची गरज : एक अभ्यास 115
**प्रा.डॉ.नंदा कंधारे**

44. "जलसाक्षरता काळाची गरज " 117
**प्रा.कदम माणिक मारोतराव**

45. 'छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण' 119
**डॉ. किशन केंद्रे**

46. पेशवे पहिले बाजीराव यांचे शेती व जलसिंचन विषयक धोरण 121
**प्रा.डॉ.सावंत के.डी.**

47. "शिवकालीन कृषि व पाणीपुरवठा" 123
**डॉ. विलास जाधव, डॉ. यास्मिन शेख**

48. "शिवकालीन जल व्यवस्थापन : एक अध्ययन" 125
**प्रा.गंगणे अमोल उत्तमराव**

49. शिवाजी महाराज यांच्या काळातील कृषीसुधारणा 127
**सहा. प्रा. दिपक हरी लहासे**

50. विजयनगर कालीन जल व्यवस्थापन : एक अभ्यास 129
**प्रा. डॉ. एन.डी.नाईक**

51. 'भारतीय कृषी अर्थव्यवस्थेत कृषी व जलविषयक समस्या व उपाययोजना' 131
**प्रा.अल्का रानबा जामकर**

52. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील जलसिंचन– विशेष संदर्भ - लातुर जिल्हा 134
**प्रा. डॉ. तवरे विलस मधुकर**

53. छत्रपती शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन विषयक धोरण 136
**प्रा.डॉ.सावंत एस.डी.**

54. मराठवाडयातील किल्ल्यातील जलव्यवस्थपनाचा भौगोलिक अभ्यास 138
**डॉ.जयदिप रामकृष्ण सोंळुके**

55. भारतीय जल व्यवस्थापनाचा इतिहास 141
**प्रा.डॉ.दत्ता यु. जाधव**

56. सिंधूपूर्व कालीन कृषी व जलव्यवस्थापन 144
**डॉ.चंदन एम.बावलगावे**

57. मध्ययुगीन काळातील कृषी व जलव्यवस्थापन 146
**प्रा.ए.जी.अंभोरे**

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 147 (I) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

# पेशवे पहिले बाजीराव यांचे शेती व जलसिंचन विषयक धोरण

**प्रा.डॉ.सावंत के.डी.**
इतिहास विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय, गेवराई

---

**प्रस्तावना :**

सतराव्या व अठराव्या शतकात महाराष्ट्रात विविध राजकीय घडामोडी घडत होत्या आणि स्वाभिवकच त्याचे पडसाद शेतकऱ्यांच्या जीवनावर आणि व्यवसायावर पडत होते. पावसाची अनिश्चितता, सतत होणारी युध्दे, आर्थिक मदतीचा अभाव इ. कारणामुळे महाराष्ट्रातील शेती व्यवसाय आणि शेतकरी हे दोन्ही मागासलेल्या अवस्थेत होते. ते सुधारणेसाठी पेशवे बाजीराव पहिले यांनी शेतीला उत्तेजन देऊन ती जलसिंचनाखाली जास्तीत जास्त कशी येईल यासाठी प्रयत्न केलेले दिसतात. ते वाचकासमोर यावे हा या शोध निबंधाचा उद्देश आहे.

**पेशवे पहिले बाजीराव यांचे शेती व जलसिंचन विषयक धोरण :-**

पेशवे बाजीराव पहिले यांनी शेतकऱ्यांना संरक्षण देऊन त्यांची स्थिती सुधारल्याचे अनेक दाखले वाचावयास मिळतात. बाजीरावच्या काळी शेती हाच प्रमुख धंदा होता. इतर उद्योगधंदे लहान प्रमाणावर चालु होते. शेती पुष्कळच चांगल्या स्थितीत असावी असे दिसते. इतर उद्योगधंदे कमी प्रमाणात असल्यामुळे कराचा बोजा प्रामुख्याने शेतीवरच होता. बाजीरावच्या काळात सरकारी वसुलाच्या बाबी पुष्कळ असल्या तरी त्या सर्वात जमीन बाब ही मुख्य होती. जमिनीच्या प्रतीप्रमाणे तिची अव्वल, दुय्यम व सीम अशी प्रतबंदी केली जात असे. ही प्रतबंदी जिराईत जमिनीपुरती होती. त्याखेरीज बागाईत जमिनीची पाटस्थळ व मोटस्थळ अशी वर्गवारी पाडलेली होती व त्यानुसार वसूल ठरविला जाई. इ.स.१७२८ मध्ये पुणे प्रांतातील करेपठार तालुक्यातील चावली गावाच्या शेतकऱ्यांना बागाईत अधिक लागवडीखाली यावी म्हणून बाजीरावने प्रोत्साहन दिल्याचे ऐतिहासिक कागदपत्रातून वाचावयास मिळते. नव्या विहिरीवरील बागाईत वाढविण्यासाठी चार वर्षांकरिता शेतसारा सूट देण्यात आला आणि पाचव्या वर्षी ह्या विहिरीवर एक मोट चालविण्यास वर्षाला एक होन आणि दोन मोटा चालविण्यास वर्षाला दीड होन शेतसारा घेण्याचा कौल सादर केला.[१]

शेतीस उत्तेजन देण्याचे प्रयत्न बाजीराव पेशव्यांनी केले. प्रत्येक गावात अनेक पड जमिनी असत. नावाला शेतसारा घेऊन अशा जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी अनेक प्रयत्न केलेत असे दिसते. अशा संबंधाचे अनेक आदेश पेशवा रोजनिशीत सापडतात. जमिनीत नवीन लागन करतांना काही मुदतीपर्यंत शेतसारा वसुलीची माफी दिली हात होती. पडीक जमिनीत नवीन लावणी करतांना रयतेकडे सहानुभूतीपूर्वक लक्ष दिले जाई. पड जमिन लावणीस घेताच तिच्यात एकदम उत्कृष्ठ उत्पन्न येणे शक्य नसे. तिची सुधारणा हळूहळू होत असे व त्याच प्रमाणात तिचे उत्पन्न वाढत असे ही बाब लक्षात घेऊन पेशवे पहिले बाजीरावाने ऑक्टोबर १७२२ मध्ये सुपे येथील सातभाई सेरे याची वाडी वगैरे पड जमिनी शेती करावयास दिली होती.[२] येथील जमिनीची लावणी पहिल्या वर्षी दर बिघा दोन आणे, दुसऱ्या वर्षी चार आणे, तिसऱ्या वर्षी सहा आणे आणि चौथ्या वर्षी दर बिघा आठ आणे याप्रमाणे चार वर्षासाठी चढत्या क्रमाने वसुलीसाठी दिली होती.

पड जमिन लवकर लागवडीत आणण्यासाठी बाजीरावने उत्तेजन दिलेले दिसते. इ.स. १७२५ मध्ये शाहापूर येथील जुन्या कुळांना रु.२०१ खंडणी पाच वर्षासाठी उगवणी करिता नेमून दिली होती आणि नवीन कुळे येतील तर त्यांना मात्र पुढील वर्षापासुन तीन वर्षापर्यंत सारा माफ केला होता व तीन वर्ष झाल्यावर योग्य ती खंडणी घ्यावी असाही आदेश दिलेला होता. त्यांनी जमिनीची लागवड करुन उगवणी केल्यावर पहिल्या वर्षी एक, दुसऱ्या वर्षी दोन आणि तिसऱ्या वर्षी तीन असा रुपये बारा करार केला म्हणजेच पहिल्या वर्षी दोन, दुसरे वर्षी चार आणि तिसरे वर्षी सहा असा एकूण रुपये बारा उगवणीसाठी करार केला होता असे आढळून येते.[३]

शत्रूची धाड पडली किंवा धामधुमी प्रसंग निर्माण झाला म्हणजे शेतकऱ्यांच्या हाती काही पिक लागत नसे. शत्रूचे तंबू ज्या ठिकाणी ठोकले असतील तेथे तर सारी जनावरे, घोडी पिकात चरावयास सोडली जात आणि सारे पिक उध्दवसत होई. पिके जाळण्याचेही प्रकार घडत. धामधुमीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असता त्या नुकसानी पुरतेच शेतकऱ्यांना साऱ्याची माफी देण्याची क्षमता पेशवे सरकार घेत असे किंवा मुलुखाची आबादानी करण्याविषयी कौल दिला जात असे. इ.स. १७२९ च्या सुमारास धामधुमीमुळे इंदापूर परगाणा उध्दवस्त झाला होता. त्यावेळी सरकारचा महसूल देण्याची कुवत शेतकऱ्यांच्या अंगी राहिली नव्हती. म्हणून पेशवे पहिले बाजीराव यांनी जिवनराव शंकर यास परगण्याची लागवड करण्याचा आदेश दिल्याचे ऐतिहासिक कागदपत्रातून आढळून येते.[४]

दुष्काळाच्या तडाख्यात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीची उपाययोजना म्हणून आर्थिक स्वरुपात मदत दिल्याची काही उदाहरणे ऐतिहासिक कागदपत्रातून वाचावयास मिळतात. पहिले बाजीराव पेशवे यांच्या काळात कर्नाटकातील खेडवाडी तालुक्यात भयानक दुष्काळ पडून तमाम मुलूख हैराण झाला होता. तेंव्हा तेथील शेतकऱ्यांना कौल देण्यात आला होता आणि पुनर्वसन करुन ज्याच्याजवळ बैल नसेल त्याला बैल घेण्यासाठी व ज्याला पोटास धान्य नसेल त्याला धान्य देऊन राहण्यासाठी घरे बांधून दिली होती.[५]

इ.स.१७२५-१९३१ च्या सुमारास नेर परगण्यात शत्रूच्या धाडी पडून पिकांची खूप नासाडी झाली होती. तसेच उदाजी पवार व गायकवाड यांच्यातील युध्दामुळे परगण्याचे अतोनात नुकसान झाले असता पेशव्यांचे बंधू चिमाजी अप्पा यानेही परगण्याची आबादानी करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते.[६]

शेतीवरील कर हे जरी तत्कालीन पेशवे सरकारचे मुख्य उत्पन्न असले तरी शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती पाहून महसूल ठरविला जात असे. एखादे वेळी महसूल ठरविल्यानंतरही जर एखादा शेतकरी किंवा कूळ महसूल देण्यास असमर्थ असल्याचे सिध्द झाल्यास त्यावेळी त्याला महसूल माफ केला जात असे आणि प्रत्येक गावी वतनदार व इनाम जमीन जितकी असेल तेवढी सोडून इतर जमिनीची मोजनी केली जाई आणि नंतर खंडणी ठरविण्यात येत असे.

काही कारणामुळे जमिनीचा कसदारपणा कमी होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होत असे परिणामी सरकारचे उत्पन्न कमी येत असे. अशा शेतकऱ्यांन संरक्षण देऊन शेतीचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करण्याचे धोरण पेशवे बाजीरावने स्विकारले होते. हे पुढील उदाहरणावरुन दिसून

येईल. "मौजे कठापूर गाव सालमजकूरी येथे रबीच्या वावरात कर्डी पेरतात त्यास कर्डी न पेरणे. गहूं, हरभरे पेरणे, रबी पिकत नाही म्हणून दहशत घेतली तर पीक रबीचे होईल त्याचा महसूल घेतला जाईल पीक कमी जाले तर सिवार पाहून पिकाप्रो। वसूल घेऊ..."[७]

शेतकऱ्यांना शेती व्यवसायात शक्य त्या प्रमाणात सवलती व साऱ्यात सूट देण्याचे धोरण पेशवे बाजीरावने स्विकारले होते. पुणे प्रांतातील हवेली तालुक्यात दिघी गावातील शेतकऱ्यांना दुष्काळाचा इ.स. १७२६ मध्ये जबरदस्त तडाखा बसला. त्यावेळी पेशव्यांचा अधिकार संभाजी पवारने पुढील वर्षाच्या लागवडीचा विचार करुन सरकारी वसुलात कमी साऱ्यात सूट दिली आणि शेतकऱ्यांना दिलासा दिल्याचे दिसून येते.[८]

तसेच बाजीरावच्या कारकीर्दीत का। पुणे मुजेरी येथील शेतकऱ्यांना दुष्काळाचा तडाखा बसला त्यावेळी पेशव्यांनी शेतकऱ्यांना अभयपत्र दिले आणि १५२६ रुपये खंडणी ठरवून दिली व पुढील वर्षाच्या लागवडीस प्रोत्साहन दिले होते.

जमिनीचे क्षेत्र जास्तीत जास्त प्रमाणात बागाईत व्हावे यासाठी पेशवे पहिले बाजीरावने पाटबंधाऱ्याच्या योजनांनाही उत्तेजन दिले. अर्थात शेतीला पाणी पुरवठा करण्याच्या कार्याकडे अगदी प्राचीन काळापासून राजे लोकांनी लक्ष दिल्याचे ऐतिहासिक कागदपत्रातून आढळते. शेतीला योग्य पाणी पुरवठा व्हावा हाच एक शेती सुधारण्याचा मार्ग त्या काळात उपलब्ध होता. बांध घालणे, कालवे खोदणे व त्याची देखभाल करणे ही सामान्यतः गावच्या लोकांची जबाबदारी मानली जात असे. कालवे- बंधारे जरी गावकऱ्यांनी बांधले तरी त्यावर सत्ता मात्र सरकारचीच असे. कारण पाणी ही निसर्गाची देणगी होती त्यामुळे त्यावर मालकी पेशवे सरकारची असे. तथापि त्याला पेशव्यांनी पूर्णपणे संरक्षण देऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याचे धोरण अवलंबिले होते. राजापूर तालुक्यातील गोठणे गांव परमहंस बाबा यांना इनाम दिलेले होते. गावालगत एक खारट पाण्याचा ओहोळ वाहत होता तो बांधून पिकपाणी घ्यावे असा आदेश पेशवा बाजीरावने कृष्णभट देसाई यांना दिला होता आणि बांध बांधल्यापासून वीस वर्षापर्यंत महसूल माफ करुन पुढे ठरवून देण्यासंबंधीचा करार करुन दिल्याचे दिसून येते.[९]

**सारांश :**

अशाप्रकारे शेतीला उत्तेजन देण्याचे धोरण बाजीराव पेशव्यांनी स्विकारले होते. शेती सुधारण्यासाठी ठिक ठिकाणी विहिरी बांधणे व बंधारे ही कामे देखील पहिले बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दीत सरकारी खर्चाने केली जात होती.

**संदर्भ सूची :**

१. सरदेसाई गो.स., पेशवे दप्तर, खंड २२, गोव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३२, लेखन २८, पृष्ठ १७
२. भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, पुणे, अंक २, वर्ष १५, पृष्ठ ६७
३. कित्ता, पृष्ठ ७०
४. शाहू दप्तर, अप्रकाशित, पुराभिलेखागार, पुणे, रुमाल ३९, पुडके ५, लेखन ५६००
५. सरदेसाई गो.स., पेशवे दप्तर, खंड-१७, गोव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३१, लेखन ८०, पृष्ठ ५९
६. स.नि.का., अप्रकाशित दप्तर, पुराभिलेखागार, पुणे, रुमाल ३, पुडके १, लेखन १४२२
७. भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, उपरोक्त, पृष्ठ ६७
८. सरदेसाई गो.स., पेशवे दप्तर, खंड ३१, उपरोक्त, लेखन १२५
९. राजवाडे वि.का., (संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ३ कोल्हापुर, १९०१, लेखन २५९.